


दैनिक अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ११६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.०८ डिसेंबर २०२४

## नियमबाह्य खरेदीखत रद्द होण्यासाठी जागरण गोंधळ घालण्याचा इशारा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, अहिल्यानगर :** पारनेर तालुक्यातील म्हसने सुलतानपूर येथील गट नंबर ३९ मध्ये शेत जमीनीवर झालेल्या नियमबाह्य प्लॉटिंगचे खरेदीखत समक्ष पंचनामा करून रद्द करण्याच्या मागणीसाठी उपोषणानंतर दिलेल्या आश्वासनाची पुर्तता न केल्याने जिल्हाधिकारी कार्यालया समोर अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने २३ डिसेंबर रोजी जागरण गोंधळ आंदोलन करण्याचा इशारा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे. तर याप्रकरणी जाणीवपूर्वक कुठलीही कारवाई न करणाऱ्या श्रीगोंदा-पारनेर उपविभागीय अधिकारी यांच्यावर दप्तर दिरंगाई कायद्यान्वये कारवाईची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. म्हसने सुलतानपूर (ता.पारनेर) गट नंबर ३९ मधील नियमबाह्य प्लॉटिंग करून खरेदीखत झाल्याने ते रद्द करण्याबाबत संघटनेच्या वतीने ७ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय आयुक्त नाशिक यांना पत्र व्यवहार करून २१ ऑक्टोंबर रोजी उपोषण करण्यात आले होते.

तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी गृहविभागने सहजिल्हा निबंधक वर्ग १ यांना पत्र दिले होते. या पत्रान्वये उपोषणापासून परावृत्त करण्यात आले. मात्र आज अखेर जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडे पत्रव्यवहार करून देखील सहजिल्हा निबंधक वर्ग १ यांनी आर्थिक हितसंबंध जोपासत कुठलीही कारवाइ केलेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

गट नंबर ३९ म्हसने सुलतानपूर येथील अनाधिकृत खरेदी खत रद्द करण्याचा संपूर्ण अधिकार श्रीगोंदा-पारनेर उपविभागीय अधिकारी यांच्याकडे असताना त्याबाबत कार्यालयास पत्र व्यवहार करून देखील अनाधिकृत प्लॉटिंग करून खरेदी खताच्या मालकाशी आर्थिक संबंध जोपासत त्यांना पाठीशी घालत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

## ऑईल मिलच्या भीषण स्फोटातील जखमी दोघा भावांचा मृत्यू



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.७, नांदेड :** सिडको येथील तिरूमला ऑइल मिलमध्ये स्फोट होऊन लागलेल्या आगीत जखमी झालेल्या दोन सख्ख्या भावाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. तर वडिलांची मृत्यूशी झुंज सुरु आहे.१ डिसेंबर रोजी तिरूमला ऑइल मिलमध्ये ही घटना घडली होती. हर्षद कोत्तावार आणि विनोद कोत्तावार असं मयताचे नाव आहे. मुलाच्या मृत्यूने कोत्तावार कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. रविवार १ डिसेंबर रोजी भास्कर कोत्तावार, हर्षद कोत्तावार, विनोद कोत्तावार यांच्या सह सुनील बंडेवार आणि सुधाकर बंडेवार हे मिल मध्ये काम करत होते. दुपारी १२ वाजताच्या सुमारास ऑईल मिलमध्ये अचानक स्फोट होऊन आगीचा भडका उडाला. आगीने रौद्र रूप धारण केले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तात्काळ मिलकडे धाव घेऊन अग्निशमन दलाला कळविले. अग्निशामक दलाच्या पथकांनी तीन गाड्यांच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळवले. पण या आगीच्या घटनेत पाच ही जण होरपळले गेले. त्यांना तात्काळ बाहेर काढून रुग्णालयात दाखल करण्यात आले. उस्मानगर रस्त्याजवळ सिडको औद्योगिक वसाहतीत भास्कर कोत्तावार यांच्या मालकीचे तिरुमला ऑईल मिल आहे. घटनेच्या दरम्यान टेप्पा क्र (एम.एच. २६ सी. एच. ०७००) हा जळून खाक झाला. दरम्यान घटनेत अति गंभीर असलेल्या दोघांना हैद्राबाद येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दुर्देवाने हर्षद कोत्तावार यांचा बुधवारी आणि विनोद कोत्तावार यांचा गुरुवारी उपचारादरम्यान मृत्यू झाला. भास्कर कोत्तावार यांच्या सह इतर दोघांवर उपचार सुरु आहे.

दोन्ही मुलाच्या पार्थिवावर एका पाठोपाठ अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान दोन्ही मुलांच्या निधनाने कोत्तावार कुटुंबियांवर दुःखाच डोंगर कोसळलं आहे. या घटनेनंतर सिडको हडको भागात शोककळा पसरली आहे. कोत्तावार कुटुंबियांना दोन मुलांच्या जाण्याने मानसिक धक्का बसला आहे. नेमका स्फोट कशामुळे झाला याचा तपास केला जात आहे.

## थंडी पुन्हा परतणार, पण कधीपासून?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, नागपूर :** फेइंगल चक्रीवादळाने राज्याला तब्बल आठ ते दहा दिवस वेठीस धरले. मात्र, जाताजाता हे चक्रवादळ दक्षिणेकडील राज्यांमध्ये पाऊस देऊन गेले. महाराष्ट्रात काही ठिकाणी पावसाच्या तुरळक सरी कोसळल्या. थंडीला पुरते परतावून लावणाऱ्या या चक्रीवादळाचा प्रभाव आता जवळजवळ संपला आहे. त्यामुळे बेपत्ता झालेल्या थंडीला पुन्हा एकदा सुरुवात होणार आहे. राज्यात नोव्हेंबर अखेरीस नुकतीच थंडीची चाहूल लागली होती. थंडीचा कडाका वाढत चालल्याने शेकोट्या पेटायला लागल्या होत्या. राज्यातील किमान तापमान आठ अंश सेल्सिअसवर येऊन पोहोचले होते. मात्र, फेइंगल चक्रीवादळाने हवामानाचे पूर्ण गणित पालटले. चक्राकार वारे आणि कमी दाबाचा पट्टा वायव्येकडे सरकत अरबी समुद्राकडे आल्याने महाराष्ट्रातही पावसाला पोषक वातावरण तयार झाले होते. हिवाळ्याची चाहूल लागताच आलेल्या अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. राज्यात सर्वत्र ढगाळ वातावरण असले तरी कमाल आणि किमान तापमानात वाढ झाली होती. मात्र, आता चक्रीवादळाचा प्रभाव जवळजवळ ओसरला आहे आणि तीच हिवाळ्यातल थंडी पुन्हा परतणार आहे. त्याचवेळी राज्यात गारठ्यात देखील वाढ होणार असल्याचे हवामान खात्याने सांगितले आहे. तापमानात अजून घसरण झाली नसली तरीही थंडीची थोडी चाहूल मात्र लागली आहे. दरम्यान, गोंदिया, बुलढाणा, अकोला जिल्ह्यात पावसाच्या तुरळक सरी कोसळल्या. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरणही होते. कोकणसह मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी पावसाचा हलका प्रभाव दिसून आला. प्रादेशिक हवामान खात्याने शनिवारी देखील विदर्भातील काही जिल्ह्यात पावसाच्या तुरळक सरी कोसळतील असा अंदाज दिला. मात्र, आता राज्यातून गायब झालेली थंडी परतणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने दिला आहे.

# विधानसभेतील पराभवानंतर 'मविआ चे' पुढे काय ?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, मुंबई :** विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला मोठं यश मिळालं. मात्र, महाविकास आघाडीला पराभवाचा मोठा धक्का बसला. महायुतीला मिळालेल्या बहुमतानंतर राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झालं.



५ डिसेंबर रोजी देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. तसेच अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. सरकार स्थापन झालं असलं तरी अद्याप मंत्रिमंडळाचा विस्तार बाकी आहे. दरम्यान, दुसरीकडे महाविकास आघाडीला विधानसभेच्या निवडणुकीत आलेल्या अपयशानंतर आघाडीतील नेत्यांकडून पराभवाची कारणं काय? यावर विचारमंथन करण्यात येत आहे.

यातच विधानसभेच्या निवडणुकीत आलेल्या अपयशामुळे महाविकास आघाडीचं भविष्य काय? असा सवाल सत्ताधाऱ्यांकडून अनेकदा विचारला जातो. यातच आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महाविकास आघाडी एकत्र लढणार की स्वतंत्र? याबाबत राजकीय वर्तुळात तर्कवितर्क लावले जात आहेत. आता यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी महाविकास आघाडीची पुढील रणनीती काय असेल? यावर भाष्य केलं आहे.

**शरद पवार काय म्हणाले?**

विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीला अपयश आलं. आता पुढे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत आहेत. मग आता पुढच्या काळात महाविकास आघाडीची रणनीती काय असेल? असा प्रश्न पत्रकार परिषदेत शरद पवार यांना विचारला असता ते म्हणाले की, आम्ही सर्व एकत्रित आगामी निवडणुकीला सामोरं जाणार आहोत. निवडणुकीत जय आणि पराजय होत असतात, त्यामुळे ना उमेद व्हायचं नसतं.

मी आयुष्यात १४ निवडणुका लढलो. मी कधी पराभव पाहिला नाही. मात्र, या निवडणुकीत राज्यात आम्हाला पराभव पाहायला मिळाला. जरी पराभव झाला असला तरी त्याची चिंता करायची नाही. लोकांमध्ये जायचं आणि काम करायचं. आज लोक देखील अस्वस्थ असल्याचं दिसंत. लोकांमध्ये उत्साह दिसत नाही. कारण निवडणुका झाल्यानंतर एक वातावरण असतं ते वातावरण महाराष्ट्रात दिसत नाही, असं शरद पवार म्हणाले.

**ईव्हीएमसंदर्भात शरद पवार काय म्हणाले?**

ईव्हीएमवर आमची शंका नाही. कारण त्यासंबंधी ठोस असे पुरावे माझ्या हातात नाहीत. पण मतदानाच्या आकडेवारीवरून काही प्रश्न निर्माण होत आहेत. काँग्रेस पक्षाला ८० लाख मते पडली आणि त्यांचे फक्त १६ आमदार निवडून आले. तर शिवसेना शिंदे गटाला ७९ लाख मते मिळाली आहेत, तर त्यांचे ५७ आमदार निवडून आले आहेत. म्हणजे एक लाख कमी मतदान मिळूनही जवळपास ४१ आमदार अधिक निवडून आले आहेत. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची मते ७२ लाख आहेत. पण आमदार निवडून आले फक्त १० आणि राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाला ५८ लाख एवढे मतदान मिळाले, पण त्यांचे ४१ आमदार निवडून आले आहेत.

# मधुकरराव पिचड यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, अकोले :** माजी आदिवासी विकासमंत्री मधुकरराव पिचड यांच्या पार्थिवावर अकोले तालुक्यात राजूर येथील मधुकरराव पिचड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कै. पिचड यांच्या पार्थिवाचे राजूर येथील निवासस्थानी अंत्यदर्शन घेत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी त्यांनी कै. पिचड यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांचे सांत्वन केले.



याप्रसंगी आमदार राधाकृष्ण विखे पाटील, आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार किरण लहामटे, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, श्रीमती हेमलता पिचड, वैभव पिचड, हेमंत पिचड आदी उपस्थित होते. माजी मंत्री मधुकरराव पिचड यांचे जाणे ही अतिशय दुःखद घटना असल्याचे नमूद करून फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राच्या राजकारणातील दलित, आदिवासी वंचित समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा त्यांची उन्नती व्हावी यासाठी आणि आदिवासींच्या वन जमिनीचा प्रश्न सोडवण्यासाठी ते कार्यतत्पर होते. राजकारणी म्हणून नव्हे तर एक समाजसुधारक म्हणूनही त्यांनी चांगले काम केले. आदिवासींच्या हक्कांसाठी त्यांनी काम केले. निळवंडे धरणाचं २० किलोमीटरचे काम थांबले होते, तेव्हा पिचड साहेबांच्या माध्यमातून निळवंडे धरणाचे काम मार्गी लागले. या धरणामुळे शंभर किलोमीटर पर्यंतच्या परिसरातील शेतकऱ्यांना आज पाणी मिळत आहे. भंडारदरा (निळवंडे) धरणाला थोर स्वातंत्र्य सेनानी राघोजी भांगरे जलाशय नाव देण्यासाठी त्यांनी आग्रही भूमिका मांडली होती. ते मितभाषी, व्यासंगी आणि उत्तम वक्ते होते. विविध विषयाचा ज्ञान, व्यासंग आणि सर्वांशी संपर्क ठेवून होते. महाराष्ट्रातील एक सुसंस्कृत, वंचितांच्या हक्कांसाठी लढणारे व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. त्यांच्या जाण्याने अतिव दुःख झाले आहे, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. कै. मधुकरराव पिचड यांच्या पार्थिवावर कै. मधुकरराव पिचड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रशासनाच्यावतीने जिल्हाधिकारी सालीमठ यांनी पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. पोलीस दलाने बंदुकीच्या फैरी झाडून मानवंदना दिली. यावेळी खासदार भाऊसाहेब वाकचौरे, हेमंत सावरा, राजाभाऊ वाजे, आमदार नरहरी झिरवाळ, सत्यजित तांबे, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यासह राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक व्यक्ती यावेळी उपस्थित होते.

# स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजरचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांकडून १.१७ कोटी दंडवसूली

**अक्षराज : जे. के. पोळ**
**दि.०७, नवी मुंबई :**

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्वतःहून दाखल करुन घेतलेल्या सुमोटो (पीआयएल नं. ३/२०२३) मध्ये दि.११ डिसेंबर २०२३ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार, वायु व ध्वनी प्रदूषण कमी करण्याबाबत आदेशित केलेले होते.



मा.उच्च न्यायालयाकडील दि.११ डिसेंबर २०२३ रोजीचे आदेश तसेच ध्वनी/ वायू प्रदूषण त्याचप्रमाणे ब्लास्टिंगच्या अनुषंगाने नागरिकांकडून नवी मुंबई महानगरपालिकेकडे प्राप्त होत असलेल्या तक्रारी विचारात घेता त्यावर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी/ उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने 'मानक कार्यप्रणाली' (स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर - एसओपी) तयार करण्यात आलेली आहे. सदर मानक कार्यप्रणालीस महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांची दि. १९ जून २०२४ रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे. या मानक कार्यप्रणालीनुसार आवश्यक त्या उपाययोजना करुन सदर मानक कार्यप्रणालीचे बांधकाम व्यवसायकांनी काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे असे यापूर्वीच सूचीत करण्यात आले आहे.

सदर मानक कार्यप्रणाली (स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर - एसओपी) चे काटेकोर पालन होण्याच्या दृष्टीने मानक कार्यप्रणालीमधील मुद्दा क्र.१२ अन्वये नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर टास्क फोर्स ची स्थापना करण्यात आलेली आहे.

मुद्दा क्र.१२ मध्ये नमूद कार्यप्रणाली अन्वये संबंधित विभागाचे सहायक आयुक्त तथा विभाग अधिकारी यांनी स्थळ पाहणी करून आपला अहवाल सहाय्यक संचालक, नगररचना, नवी मुंबई महानगरपालिका यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने स्थळपाहणी दरम्यान तपासावयाच्या बाबींची तपाससूची (चेकलिस्ट) तयार करण्यात आलेली आहे. त्यानुसार सर्व संबंधित विभागांचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील बांधकाम सुरु असलेल्या स्थळांची वेळोवेळी पाहणी करुन त्याचे अनुपालन करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे.

त्यास अनुसरुन नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभाग कार्यक्षेत्रामधील बांधकाम सुरु असलेल्या ७८ स्थळांची पाहणी नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली असून सदर बांधकामाच्या ठिकाणी स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर च्या चेकलिस्ट नुसार आढळून आलेल्या त्रुटीं करिता संबंधीत विकासकांकडून एकूण रु.१ कोटी १७ लक्ष १६ हजार ९३१ इतक्या रक्कमेच्या दंडात्मक शुल्काची आकारणी करुन त्याची वसूली बांधकाम व्यवसायांकडून घेणेबाबत नमुंमपा आयुक्त यांचे निर्देशानुसार संबंधीत विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी यांना दि.२९ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या पत्रानुसार सूचना देण्यात आलेल्या असून सदर मानक कार्यप्रणाली (एसओपी) चे उल्लघंन करणाऱ्या विकासकांवर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

## संपादकीय



## सत्र परीक्षा पद्धत !

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) २०१५ पासून 'चॉइस बेस्ड क्रेडिट सिस्टम' (सीबीसीएस)च्या अंमलबजावणीतून शैक्षणिक वर्षात, सत्र परीक्षा पद्धत (सेमिस्टर सिस्टिम) देशभरात सुरू केली. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) २०२० नुसार यापुढे सत्र पद्धती सुरूच राहणार आहे. यात शैक्षणिक वर्षाचे दोन किंवा अधिक सत्रांमध्ये विभाजन केले जाते. ही पद्धत भारतात तसेच इतर देशांम ध्ये उच्च शिक्षण संस्थांमध्ये राबविली जाते. आज या पद्धतीचा सर्वत्र स्वीकार केल्यानंतर सत्र परीक्षा पद्धतीने खरोखरच भारतातील उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारत आहे का, की उच्च शिक्षणाची त्यामुळे अधोगती होत आहे, याची सर्वांगाने समीक्षा करणे अत्यावश्यक आहे.

यूजीसीच्या १८ जुलै २०१८ च्या अधिसूचनेत सत्र पद्धतीत वर्षाच्या कालावधी नियोजनाचे दिशानिर्देश करण्यात आले आहे. यात सहा दिवसांचा आठवडा असलेल्या म हाविद्यालयात प्रत्येक सत्रात शिकवण्यासाठी ९० दिवस (तीन महिने), प्रवेश परीक्षा आणि परीक्षेचे नियोजन यासाठी ३५ दिवस (पाच आठवडे), उन्हाळी आणि हिवाळी सुट्ट्यांसाठी प्रत्येकी पाच आठवडे, सरकारी सुट्ट्यांसाठी एक आठवडा अशी विभागणी करण्यात आली आहे. कला, वाणिज्य आणि विज्ञान या शाखांमधून भारतात बीए, एमए, बीकॉम, एमकॉम, बीएस्सी आणि एमएस्सी, इत्यादी पदव्या दिल्या जातात. पारंपारिक पदवी अभ्यासक्रमांचा विचार करता, भारतीय सम ाज, भौगोलिक स्थिती, सामाजिक विविधता आणि लोकसंख्या यामुळे प्रत्यक्ष जमिनीवर 'सत्र परीक्षा पद्धती' पूर्णपणे अपयशी ठरल्याचे दिसते.

**शिकवणे कमी आणि परीक्षा जास्त**

सत्र परीक्षा पद्धतीमुळे महाविद्यालयांत शिकवणे कमी आणि परीक्षाच जास्त अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. यूजीसीच्या २०१८ च्या पत्रानुसार प्रत्येक सत्रात ९० दिवस (साधारणपणे तीन महिने) शिकवणे झालेच पाहिजे, असा अट्टहास आहे. ९० दिवसांचा कालावधी एक विषय शिकवण्यासाठी पुरेसा आहे का, हा चिंतनाचा आणि संशोधनाचा विषय आहे. तीन महिन्यांचा कालावधी विषयाच्या आकलनासाठी परिपूर्ण नसला तरी हा कालावधीदेखील नावालाच आहे. प्रत्येक सत्रात, प्रत्यक्षात महाविद्यालय पातळीवर शिकण्या आणि शिकवण्यासाठी ९० दिवसांपेक्षा कमी कालावधी मिळतो.

कारण राज्यातील महाविद्यालये विद्यापीठांशी संलग्न आहेत. विद्यापीठांमध्ये पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमात शिकवले जाणारे हजारो विषयांच्या परीक्षा आणि मूल्यम ापन हे यूजीसीच्या दिलेल्या ३५ दिवसांच्या कालावधीत बसवणे कुठल्याही विद्यापीठाला निव्वळ अशक्य आहे. यात सीबीसीएस आणि पुन:परीक्षा किंवा रिपीटर विद्यार्थ्यांच्या परीक्षांचा विचार केल्यास परीक्षा कालावधी वाढतच जातो. हा कालावधी सत्राला ७५ ते ९० दिवसांपर्यंत (अडीच ते तीन महिन्यांपर्यंत) लांबत जातो. म्हणजेच एका वर्षाचा विचार केल्यास परीक्षा आणि मूल्यांकन यात सहा म हिन्यांपेक्षा जास्त कालावधी खर्च होतो. याचा परिपाक म्हणून शिकवण्यासाठी दिलेला तीन महिन्यांचा कालावधी आकुंचित होऊन दोन म हिनेच शिल्लक राहतात. तत्त्वत: आधीच विषय शिकवण्यासाठी मिळालेला कमी कालावधी आणखी कमी होतो.

परीक्षेच्या कालावधीत महाविद्यालयातील अनेक वर्गखोल्या अडकून असतात. प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी परीक्षा प्रक्रियेम ध्ये व्यग्र असतात. या काळात प्राध्यापक शिकवण्यासाठी उपलब्ध होत नाही. नियमित आणि नापास झालेले विद्यार्थी लांबलेल्या परीक्षेमध्ये गुंतलेले असतात. ते शिकण्यासाठी वर्गामध्ये हजर नसतात. परिणामी परीक्षा संपेपर्यंत, महाविद्यालयात शिकणे आणि शिकवण्याची महत्त्वाची प्रक्रिया थांबून राहते.

# एहसान फरामोश बांगलादेशला त्याची जागा दाखवून द्या

१९७१ पर्यंत बांगलादेश हा पाकिस्तानचा एक भाग होता. तेंव्हा त्याला पूर्व पाकिस्तान असे म्हंटले जायचे. पाकिस्तानच्या राजवटीत बांगलादेशातील नागरिकांवर अनन्वित अत्याचार होत होते. बांगलादेश हा पाकिस्तानचा घटक असूनही बांगलादेशी नागरिकांवर पाकिस्तान जुलुम करत होता. पाकिस्तानच्या जुलमी राजवटीला कंटाळून बांगलादेशचे तात्कालिन नेते शेख मुजिबिर रहेमान यांनी पाकिस्तानी सरकार विरुद्ध बंड पुकारले.

त्यांच्या या बंडास बांगलादेशी नागरिकांनी प्रतिसाद दिला आणि लोक रस्त्यांवर उतरले मात्र पाकिस्तानने दडपशाही म ार्गाने हे आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला तेंव्हा शेख म ुजीबिर रेहमान यांनी भारताच्या तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याकडे मदतीची याचना केली. इंदिरा गांधी यांनी तत्काळ बांगलादेशी नागरिकांना पाठिंबा दिला आणि भारतीय लष्कराने पाकिस्तानशी मुकाबला करून बांगलादेशला पाकिस्तानच्या गुलामीतून मुक्त केले. पाकिस्तानच्या निर्मितीत भारताचा मोठा वाटा आहे नव्हे भारतामुळेच बांगलादेशची निर्मिती झाली. पाकिस्तानच्या जुलमी राजवटीतून मुक्त झाल्या पासून बांगलादेश आणि भारताचे संबंध मैत्रीचे च राहिले आहेत. मोठ्या भावाच्या रुपात भारताने बांगलादेशला नेहमीच त्यांच्या संकटात मदत केली मात्र आता परिस्थिती बदलली आहे.

बांगलादेश मधील सध्याचे सरकार आणि बांगलादेशी नागरिक भारताच्या उपकाराला विसरली असून भारतालाच शत्रू मानू लागली आहेत. बांगलादेशात सध्या भारता विरुद्ध मोठा जनक्षोभ पाहायला मिळत आहे. बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांचे सरकार पाडून तेथील कट्टरपंथीयांनी सत्ता हस्तगत केली. कट्टरपंथीय, लष्कर आणि जनतेचा रोष पाहून



शेख हसीना यांनी भारतात पलायन केले. शेख हसीना यांचे भारताशी सौहार्दाचे संबंध होते म्हणूनच भारताने त्यांना भारतात आश्रय दिला कदाचित हेच तेथील नवनियुक्त सरकारला आणि कट्टरपंथीयांना रुचले नसावे म्हणूनच त्यांनी बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्यांक नागरिकांना लक्ष करण्यास सुरुवात केले. गेल्या काही महिन्यात बांगलादेशातील हिंदू मंदिरांवर आणि हिंदू नागरिकांवर हल्ले होऊ लागले. मागील काही महिन्यात बांगलादेशात हिंदूवरील हल्ल्याच्या ३०० घटना घडल्या आहेत. यात काही नागरिकांना जीव देखील गमवावा लागला आहे. हिंदूंच्या मंदिरांवर आणि घरांवर जाणीवपूर्वक हल्ले केले जात आहेत. हिंदूंनी बांगलादेश सोडून जावे असे जाहीरपणे इशारे दिले जात आहेत.

या कट्टरपंथीय हल्लेखोरांना रोखण्यात तेथील डॉ मोहंमद युनूस यांचे सरकार अपयशी ठरत आहे किंबहुना या हल्लेखोरांना तेच पाठीशी घालत आहेत. बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदूंचे संरक्षण करणे हे तेथील सरकारचे कर्तव्यच आहे म ात्र आपले कर्तव्य विसरून तेथील सरकार कट्टरपंथीयांना मोकळीक देत आहे. इतकेच नाही तर बांगलादेशात भारत विरोधी वातावरण निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न करत आहे. डॉ मोहंमद युनूस हे नोबेल पारितोषिक विजेते आहेत. त्यांची बांगलादेशचा हंगामी पंतप्रधानपदी निवड झाल्यावर भारताने त्याचे स्वागत केले होते. त्यांच्याकडून न्याय आणि समानतेची अपेक्षा होती मात्र आता ती अपेक्षा फोल ठरली. त्यांच्या कारकीर्दीत भारत आणि बांगलादेश यांच्यात मैत्रीचे संबंध प्रस्थापित होतील असे वाटले होते पण त्यांनी मात्र भारताशी पंगा घेण्याचेच ठरवले आहे. बांगलादेश नॅशनलिस्ट पक्षाचे नेते रहुल कबीर रिझवी यांनी आपल्या बायकोची साडी जाळून भारतीय मालावर बहिष्कार घालण्याचे आव्हान केले इतकेच नाही तर भारतीय प्रसार माध्यमांवर देखील बंदी घालण्याचे आव्हान केले. इतके सगळे होत असताना डॉ मोहंमद युनूस या कट्टरपंथीयांवर कोणतीही कारवाई करत नाहीत उलट त्यांची बाजू घेऊन भारतवरच आरोप करीत आहेत.

म्हणूनच आता बांगलादेशातील हिंदूवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी आणि बांग्लादेशात भारता विरुद्ध वाढणारा जनक्षोभ कमी करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने हस्तक्षेप करावा आणि तिथे शांती सेना तैनात करावी. भारताने देखील या प्रकरणात बघ्याची भूमिका सोडून अहेसान फरामोश बांगलादेशला त्यांची जागा दाखवून द्यावी.

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# नागरी सुविधा कामांच्या निविदांसाठी तांत्रिक समिती स्थापन कामकाजात येणार सूसुत्रता व गतीमानता

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०७, नवी मुंबई :** महानगरपालिका क्षेत्रात रस्ते, पदपथ, गटारे, इमारती, नाले तसेच पाणी पुरवठा, मलनि:स्सारण, विद्युत अशी विविध प्रकारची नागरी सुविधा कामे करतांना अर्थसंकल्पातील संबधित लेखाशिर्षांतर्गत तरतूदी अन्वये तांत्रिक मान्यता व प्रशासकिय मान्यता झाल्यानंतर निविदा काढण्यात येतात. या निविदा प्रक्रियेत सुनियोजितपणा व गतिमानता येण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी या क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञ निवृत्त शासकीय अधिकाऱ्यांची निविदा शर्ती / पूर्व अहर्ताबाबत तांत्रिक समिती (टेंडर, टेंडर कंडिशन, प्री कॉलिफिकेशन, क्वालिटी अॅशूरन्स प्लॅन टेक्निकल कमिटी) स्थापन केली आहे.

प्रस्तावित कामांच्या निविदा काढतांना त्यामध्ये कामाच्या स्वरुपानुसार काही बदल करण्यात येतात. या निविदा सादर करतांना प्रमाण निविदा (स्टँडर्ड टेंडर) बनवून निविदेमध्ये सारखेपणा येण्यासाठी प्रत्येक कामाची निविदा अद्यावत शासन निर्णयाप्रम



ाणे शहर अभियंता यांच्या मंजूरीनंतर वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दीसाठी पाठविण्यात येतात.

निविदेच्या कार्यालयीन प्रक्रियेत अधिक सुसूत्रता व पारदर्शकता येण्यासाठी आणि कामाचा वेग वाढवून जलद निपटारा होण्याच्या दृष्टीने तसेच अर्थसंकल्पात नमूद कामे त्याच अर्थसंकल्पीय तरतूदीनुसार पूर्ण होण्यासाठी कार्यनियोजन करण्यात आले आहे. त्यास अनुसरून प्रस्तावित कामांचे अंदाजपत्रक व पूर्ण झालेल्या निविदांच्या सर्व नस्ती संबंधित विभागाचे कार्यकारी अभियंता यांचेमार्फत कार्यकारी अभियंता (प्रकल्प नियोजन) यांचे अधिनस्त असलेल्या उपअभियंता यांनी तपासून व छाननी करुन कार्यकारी अभियंता (प्रकल्प नियोजन) यांचेमार्फत शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्याकडे निविदा मंजूरीसाठी सादर करावयाच्या आहेत.

या कामामध्ये सूसुत्रता येण्याकरिता व निविदा विषयक कागदपत्रे अद्यावत करण्याकरिता निविदा शर्ती / पूर्व अहर्ता बाबतची तांत्रिक समिती (टेंडर, टेंडर कंडिशन, प्री कॉलिफिकेशन, क्वालिटी अॅशूरन्स प्लॅन टेक्निकल कमिटी) स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये निवृत्त सचिव अथवा शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग वा एमएसआरडीसी आणि समकक्ष मुख्य अभियंता या समितीचे अध्यक्ष असणार आहेत. त्याचप्रमाणे सिडकोचे निवृत्त मुख्य अभियंता आणि महानगरपालिकेचे निवृत्त शहर अभियंता हे सदस्य असतील.

महानगरपालिकेचे प्रकल्प नियोजन कार्यकारी अभियंता हे समितीचे सदस्य सचिव असतील.

या निविदाविषयक तांत्रिक समितीमुळे नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या नागरी सुविधा कामांमध्ये सुनियोजितपणा व पारदर्शकता येणार असून कामकाजाचा वेगही वाढणार आहे.

### स्नुषा..

नवरा मुलगा सजला
बने सत्ता त्यांचीस्नुषा
मना खिन्नता दाटली
स्वागत करतो सहर्षा

सिंहासनाधीश्वर दुजे
जनस्नेहाची हो वर्षा
जडावले अंत:करण
सोडताना वास्तू वर्षा

डोळ्यां लपवूनपाणी
हसतोयं त्यांच्या हर्षा
मुजरा घेणारा असून
सलामकरतो उत्कर्षा

प्रयास चाले अहोरात्र
धीर नव्हता रे संघर्षा
कौतुक चाले दुजांचे
दाद देतोयं परोत्कर्षा

खुशीतसारे कार्यकर्ते
बडवायलाढोलताशा
वग नाट्य बदले पात्र
रंगला वेगळा तमाशा

गुलाल पोती हिरमुसे
खीळ बसला आवेशा
आश्चर्याने पहात राही
आकस्मित चंचूप्रवेशा

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# महाराष्ट्र विद्यालय खापरखेडा येथे महापरिनिर्वाण दिन संपन्न

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.६, नागपूर :** विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा ६८ वा महापरिनिर्वाण दिन विद्यालयाच्या प्रांगणात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेचे पर्यवेक्षक प्रमोद इखे अध्यक्षस्थानी होते. तर पर्यवेक्षक पद्माकर राऊत, वरिष्ठ शिक्षक अभय पुल्लीवार, रेवतकर मॅडम, गिऱ्हे मॅडम अतिथी म्हणून उपस्थित होते.

सर्व पाहुण्यांच्या हस्ते बाबासाहेबांच्या प्रतिमेला माल्या अर्पण व ज्योत प्रज्वलित करून आदरांजली अर्पण करण्यात आली. महापरिनिर्वाण



दिन अंतर्गत शाळेत निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा व भीम गीत गायन स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांच्या जीवनावर प्रकाश टाकून आदरांजली अर्पण केली. गीत गायन स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी सुरेल गीतांची मेजवानी दिली. विद्यालयातील शिक्षक तेजराव बागडे यांनी ऊस्फूर्तपणे आदरांजली गीत सादर केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमोद इखे व प्रमुख अतिथी अभय पुल्लीवार यांची समायोजित भाषणे झाली. कार्यक्रमाचे संचालन तेजराव बागडे यांनी केले तर ज्येष्ठ शिक्षिका खापरे मॅडम यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षिका नलिनी काकडे, इंदिरा भड व शाळेच्या सर्व शिक्षकांनी अथक परिश्रम घेतले.

## नगर - पुणे रेल्वेमार्गाचा संसदेत प्रश्न !

# खा.लंके यांच्याकडून रेल्वेमार्गाच्या लाईनचे काम सुरू करण्याची मागणी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.७, अहिल्यानगर :** नगर – पुणे इंटरसिटी रेल्वेमार्गाच्या लाईनचे काम केवळ मेंन्टनन्स पॉइंट उपलब्ध नसल्याने अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. हे काम लवकरात लवकर सुरू करण्याबाबत कार्यवाही करण्याची मागणी खा. निलेश लंके यांनी संसदेत केली.

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात बुधवारी सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासात उपस्थित केली. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सभागृहाचे लक्ष वेधताना खा. लंके यांनी विविध प्रश्न उपस्थित केले. ते म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर व अहिल्यानगर ते पुणे रेल्वेमार्गा अनेक महत्त्वाच्या शहरांशी संबंधित आहे. या मार्गावर शी. क्षेत्र देवगड, श्री क्षेत्र शनिशिंगणापूर, श्रीक्षेत्र शिर्डी आणि गणपती रांजणगाव आदी महत्त्वपूर्ण धार्मिक स्थळे आहेत. या धार्मिक स्थळांना भेटी देण्यासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे.

या मार्गावर वाळुंज, सुपा, गणपती रांजणगाव, पुणे हे औद्योगिक क्षेत आहेत. तिथे काम करणारे अनेक मजूर, कामगार, व्यापाऱ्यांनाही प्रवास करावा लागतो. हा रेल्वेमार्ग झाल्यास अनेक प्रवाशांचा प्रवास सुलभ होईल तसेच औद्योगिक क्षेत्रातील उत्पादित मालाच्या वाहतुकीसाठी सुविधा उपलब्ध होईल. या मार्गावर पुणे, संभाजीनगर व शिर्डी ही विमानतळे असल्याने हा मार्ग महत्वपूर्ण आहे. तसेच नगर – कल्याण रेल्वेमार्गाचे काम सुरू होणेही महत्त्वाचे आहे. बीड, नगरचे लोक पुणे, मुंबई, कल्याणशी निगडित आहेत. त्यासाठी हा मार्ग सुरू करून प्रवाशांना सुविधा उपलब्ध करून देण्याची आग्रही मागणी खा.लंके यांनी केली. नगर दक्षिण लोकसभेला मतदारसंघातील निंबळक हे गाव नगर शहराशी निगडित आहे. या गावाजवळील रेल्वेमार्गावर उड्डाणपूल आवश्यक आहे. कारण,२५ ते ३० गावांचा रोजचा संपर्क या रेल्वे मार्गावरून आहे.

दर १५ मिनिटांनी रेल्वे क्रॉसिंगसाठी हा मार्ग बंद होतो. त्यामुळे नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी या उड्डाणपूलाचे काम लवकरात लवकर सुरू करण्याची मागणी खा. निलेश लंके यांनी केली.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## संतभूमिचा विकास करण्यासाठी आ.आवताडे यांना मंत्री पदाची संधी देण्यात यावी



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०७, पंढरपूर :** संत भूमी आणि देवभूमीची प्रामाणिकपणे सेवा करून कमी कालावधीत मतदार संघात कोट्यावधींचा निधी आणून विकासाची गंगा आणणारे पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे आम दार समाधान आवताडे यांनी केलेल्या कामामुळे येथील जनतेने त्यांना दुसऱ्यांदा संधी दिली आहे. याची दखल घेऊन त्यांना सोलापूर जिल्हा बरोबर राज्याचे आराध्य दैवत असलेल्या पंढरपूर देवभूमी आणि मंगळवेढा संत भूमीचा विकास करण्यासाठी मंत्रीपदाची संधी देण्यात यावी अशी मागणी भाजपाचे आमिन शेख यांनी केली आहे.

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान अवताडे यांनी कमी कालावधीत सतत पाठपुरावा करून आपल्या मतदारसंघातील पंढरपूर तालुक्यात एम आयडीसी, मंगळवेढा तालुक्यातील २४ गावांसाठी उपसा सिंचन योजना याचबरोबर संपूर्ण मतदारसंघात रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य, वीज सुविधा उपलब्ध करून देऊन विविध विकास कामांसाठी कोट्यावधी रुपये निधी आणून मतदार संघाचा कायापालट करीत पंढरपूर मंगळवेढा तालुक्यातील जनतेच्या मनातील आमदार अशी एक आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. आमदार आवताडे यांच्या कामाची हातोटी संपूर्ण जिल्ह्याने पाहिल्याने सोलापूर जिल्ह्याला आमदार समाधान आवताडे सारखा पालकमंत्री होणे गरजेचे आहे. पंढरपूर तालुक्याला पूर्वीपासूनच मंत्रीपदापासून वंचित ठेवण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार समाधान आवताडे यांना मंत्री पदाची संधी दिल्यास आमदार आवताडे यांच्या कामाच्या हातुटीचा सोलापूर जिल्ह्याला याचबरोबर पंढरपूर देवभूमी आणि मंगळवेढा संतभूमीला फायदा होणार असून याचा भाजपालाहि मोठे फायदा होणार असल्याचे मत भाजपाचे आमीन शेख यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केले आहे. त्यांनी भाजपाच्या नेतेमंडळींकडे आमदार आवताडे यांना मंत्रीपदाची संधी देण्यात यावी अशी मागणी केली असल्याचे सांगितले आहे.

## संविधान निर्मितीतून डॉ.आंबेडकरांनी माणसाला माणसाशी जोडले

**अक्षराज : दशरथ राऊत**

**दि.०७, खंडाळा :** ०६ डिसेंबर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त खंडाळा शहर यांच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली देण्यात आली यावेळी भारतीय जनता पार्टी खंडाळा तालुकाध्यक्ष अनिरुद्ध(संजीव)शंकरराव गाढवे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मनोगत व्यक्त करताना अनिरुद्ध गाढवे म्हणाले- भारत देशाला गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी अनेक महापुरुष व वीरांगणा यांनी हौतात्म्य स्वीकारले स्वतंत्र भारताला एकसंघ ठेवण्यासाठी स्वराज्य, सुराज्य यासोबत लिखित नियम ग्रंथाची गरज होती. यासाठी डॉ.आंबेडकर यांनी संविधान निर्मिती करून माणसाला माणसाशी जोडण्याच मोठं काम केले असे महापुरुष पुन्हा होणे नाही.

यावेळी बापूराव धायगुडे, अतुल बाबा पवार, संदीप जाधव, साजिद मुल्ला, चंद्रकांत पवार, फिरोज पटवेकरी, प्रकाश काका गाढवे, हणमंत यादव, संजय आवटे, बाळासाहेब भोसले, धनंजय गायकवाड आदींची उपस्थिती होती.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन व चैत्यभूमी येथे भोजनदान



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०७, घणसोली (नवी मुंबई) :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त नवी मुंबई, घणसोली, डी मार्ट येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. ज्यांना मुंबईला जाणे शक्य होत नाही अशा भीम प्रेमी अनुयायांना, बाबासाहेबांना अभिवादन करता यावे याकरिता प्रा. दत्ता हेगडे यांच्या अध्यक्षतेखाली घनसोली डी मार्ट येथे स्टेज लावून बाबासाहेबांची प्रतिमा ठेवून अभिवादन करण्याची सोय करून देण्यात आली होती. तसेच अल्पोपहार आणि पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. या कार्यक्रमात रबाळे पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत तसेच माजी नगरसेवक घनश्याम मढवी हे सहभागी झाले होते. दुपारनंतर सर्व कार्यकर्त्यांसह मुंबई दादर चैत्यभूमी येथे टेम्पो मधून जेवण घेऊन जाऊन भिमरायाला अभिवादन करण्यासाठी आलेल्या अनुयायांना भोजनदान करण्यात आले.

सदर कार्यक्रमाकरिता अध्यक्ष प्रा. दत्ता हेगडे यांच्यासह, उपाध्यक्ष अरविंदसिंग राव, सचिव दीपक बनसोडे, बेलापूर विधानसभा अध्यक्ष विनोद धुरंधर, बीएसपी चे नवी मुंबईचे माजी महासचिव चंद्रकांत राजगुरू, संदेश कांबळे, अशोक जगताप, जे.के. पोळ, मोनिका शिंदे, सारिका हेगडे, शालिनी धुरंधर, प्रियदर्शनी, राज, शुभम, तन्वी, समीर, मोईन, इ. कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम करून विशेष योगदान दिले. या कार्यक्रमासाठी आर्थिक मदत करणारे व वस्तुरूपाने,धान्यरूपाने, श्रमरूपाने मदत करणारे सर्व जणांचे प्रा. दत्ता हेगडे यांनी आभार मानले.

## खा. निलेश लंके अजित पवार गटात येणार ? अहिल्या नगरच्या राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.६, अहिल्यानगर :** सहा महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात मोठा उलटफेर पाहायला मिळाला. निलेश लंके यांनी सुजय विखे पाटील यांचा पराभव करत राजकीय वर्तुळात खळबळ उडवली. लोकसभा निवडणुकीच्या वेळी त्यांनी ऐनवेळी अजित पवार गटातून उडी घेत शरद पवार यांच्या गटात जात हाती तुतारी घेऊन अचूक टाइमिंग साधले होते. पण आता पुन्हा एकदा लंके यांच्या याच अचूक टायमिंगची चर्चा होत आहे. खासदार निलेश लंके हे पुन्हा एकदा अजितदादांच्या गटात सामील होणार अशा चर्चांना नगरच्या राजकीय वर्तुळात उधाण आले आहे. या चर्चा सुरू झाल्यात त्या लंके यांच्या एका विधानामुळे. लंके यांनी कार्यकर्त्यांच्या चिंतन बैठकीत येत्या महिन्याभरात गुड



न्यूज देणार असे म्हटले होते. तेव्हापासून लंके हे अजित पवार गटात सामील होत सत्तेत सहभागी होणार अशा चर्चांनी जोर पकडला आहे.

लंके यांच्या या विधानामुळे त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये देखील एक नवीन जोश पाहायला मिळतोय. विधानसभा निवडणुकीत खासदार लंके यांच्या धर्मपत्नी राणी लंके यादेखील निवडणुकीच्या रिंगणात होत्या. पारनेर विधानसभा मतदारसंघातून राणी लंके यांनी निवडणूक लढवली. मात्र यात त्यांचा दारुण पराभव झाला. त्यामुळे सैरभैर झालेल्या कार्यकर्त्यांना दिलासा देण्यासाठी पारनेर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाने चिंतन बैठकीचे आयोजन केले होते. याच बैठकीत खासदार निलेश लंके यांनी येत्या महिन्याभरात गुड न्यूज देणार असे वक्तव्य केले होते. लंके यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात निलेश लंके हे पुन्हा एकदा अजित पवार गटात सामील होत सत्तेच्या परिघात दिसू शकतात अशी चर्चा सुरू झाल्या आहेत. दरम्यान, आता याच साऱ्या चर्चांवर खासदार निलेश लंके यांनी स्पष्टीकरण दिले आहे. खासदार निलेश लंके यांनी, मी अजित दादांबरोबर जाणार असल्याचे मलाच प्रसार माध्यमांच्या माध्यमातून समजत आहे. मात्र माझा तसा काही विचार नाहीये. सध्यातरी तसा विचार केला नाही आणि भविष्यातही तसा विचार होणार नाही. गेल्या दोन दिवसात मी कोणतीही नेत्याला भेटलेलो नाही. सध्या मी अधिवेशनाच्या निमित्ताने राष्ट्रीय राजधानी दिल्लीत आहे, असं म्हणत लंके यांनी सध्या राजकीय वर्तुळात सुरू असणाऱ्या चर्चांना पूर्णविराम दिला आहे. मात्र असे असले तरी राज्याच्या राजकारणात काहीही होऊ शकते यामुळे आगामी काळात निलेश लंके खरंच काही वेगळी भूमिका घेणार का हे पाहण्यासारखे ठरणार आहे.

## 'घर घर संविधान' या अभियानातून नवी मुंबईत संविधान साक्षर मोहीमेचा प्रारंभ

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०६, नवी मुंबई :** भारताचे संविधान हे केवळ एक पुस्तक नाही तर आपल्या जीवनशैलीचे मार्गदर्शक आहे अशा शब्दात संविधानाचे महत्व विशद करीत माजी मुख्य आयुक्त जे. एस. सहारिया यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेचा थेट जनतेशी संबंध असल्याने महानगरपालिकेतील प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांनी आपल्याला समाजासाठी उपयोगी पडण्याची ही उत्तम संधी असल्याचे जाणून काम करावे असे सांगितले. यादृष्टीने संविधानातील मूल्यांचा आपल्या कामकाजात कसा उपयोग होईल व यातून नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी व समाजातील शेवटच्या माणसाला कशी मदत होईल याचे भान राखून काम करायला हवे असे ते म्हणाले.

अमृत महोत्सवी संविधान पर्वानिमित्त आयोजित से-१५ ,ऐरोली येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्ञानस्मारकातील सभागृहामध्ये संपन्न झालेल्या 'संविधान परिचय कार्यशाळे' प्रसंगी ते बोलत होते. यावेळी पालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, सहआयुक्त समीर उन्हाळे, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे तसेच कार्यशाळेतील व्याख्यात्या कॉमनवेल्थ लोकल गव्हर्मेंट फोरम आशियाच्या प्रादेशिक कार्यक्रम व्यवस्थापक अनुया कुंवर, संविधान अभ्यासक लेखक सुरेश सावंत आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना व्याख्यात्या अनुया कुंवर यांनी संविधानाचे महत्व जाणून त्याची महती जनमानसापर्यंत पोहोचविण्यासाठी पुढाकार घेऊन प्रत्यक्ष कृती आराखडा तयार करणारी पहिली महानगरपालिका म्हणून नवी मुंबई महानगरपालिकेचा गौरव केला. कॉमनवेल्थ लोकल गव्हर्मेंट फोरमच्या वतीने सुशासनासाठी करण्यात येणाऱ्या




धोरणांची माहिती देत त्यांनी अबार्डिन अजेंडानुसार सुशासनासाठी प्रमाण मानके म्हणून निश्चित केलेल्या १२ तत्वांचे विवेचन केले. संविधानाने सांगितलेल्या मूल्यांचा आपण दैनंदिन कामकाजात वापर करीत आहोत काय? असा प्रश्न स्वत:लाच विचारून प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्याने आत्मचिंतन केले पाहिजे असेही त्यांनी सांगितले.

संविधानाचे अभ्यासक सुरेश सावंत यांनी हे ज्ञानस्मारक म्हणजे प्रेरणास्थान आहे, याठिकाणी आल्यानंतर समृध्द झाल्यासारखे वाटते असे सांगत आयुक्तांनी 'नवी मुंबई संविधान साक्षर मोहीम' राबविण्याचे सुव्यवस्थित नियोजन केल्याबद्दल प्रशंसा केली. ही मोहीम राबविताना पहिल्या टप्प्यात संविधान परिचय वर्ग आयोजन व दुसऱ्या टप्प्यात घर घर संविधान साक्षर मोहीम राबविली जात असल्याची माहिती त्यांनी दिली. या नियोजित मोहीमेचा आराखडा सादरीकरणाद्वारे मांडत त्यांनी संविधान समजणे ही साक्षरतेची पहिली पायरी असल्याचे सांगितले व संविधानाची उद्देशिका हे तिचे सार असून उद्देशिकेतील मूल्यांचा अर्थ उलगडून सांगितला.

आयुक्तांनी समारोप करताना विविध मुद्दयांचा परामर्श घेतला. संविधानाने ज्याप्रमाणे प्रत्येक नागरिकाला हक्क व अधिकार दिले आहेत, तशीच काही कर्तव्यदेखील सांगितली आहेत, त्यादृष्टीने लोकजागृती करण्यासाठी प्रयत्न केले जातील असे सांगितले. 'मी इथे का आहे?' असा प्रश्न प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांनी स्वत:ला विचारला पाहिजे व आपल्याला जनतेसाठी काम करण्याची मोठी संधी महानगर पालिकेचा कर्मचारी म्हणून मिळाली याची जाणीव ठेवावी, आपल्या अधिकारांचा वापर शिक्षा करण्यासाठी नाही तर माणसाचे जीवन आनंदी करण्यासाठी आहे याचे भान राखून काम करावे असे मत यावेळी आयुक्तांनी व्यक्त केले.

नवी मुंबई महानगरपालिकेने आधुनिक काळाला साजेशी संगणकीय ऑनलाईन कार्यप्रणाली अंगिकृत करीत नागरिकांसाठी ग्रिव्हेन्स रिड्रेसल सिस्टीम, माय एनएनएम सी ॲप विकसीत केले असून नागरिकांच्या तक्रारी सोडवणुकीसाठी नियोजनबध्द कार्यप्रणाली आत्मसात केली आहे तसेच थेट संवादी दृष्टीकोन ठेवला आहे असेही आयुक्तांनी सांगितले. व्याख्यात्यांनी मांडलेल्या बाबींवर सविस्तर भाष्य करताना समाजातील सर्व घटकांपर्यंत संविधान साक्षरता मोहीम पोहोचविण्यासाठी ठोस नियोजन केले जात असल्याची माहिती त्यांनी दिली.


संघरत्ना खिल्लारे यांनी प्रास्ताविकपर मनोगतात ज्ञानकेंद्र म्हणून नावाजल्या जाणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकातील उल्लेखनीय सुविधांची व नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती देत संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संविधान परिचय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले.

पालिकेच्या वतीने यापुढील काळात शासनाने निर्देशित केल्यानुसार 'घर घर संविधान' अभियान व्यापक स्वरुपात राबविले जाणार असून त्याचा प्रारंभ या संविधान परिचय कार्यशाळेने झाला.

## भोपी कुटुंबीयांनी खंडोबा मंदिरात चंपाषष्टी उत्सव केला साजरा

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०७, नवी मुंबई :** उत्सव मार्गशीर्ष शुक्ल प्रतिपादा ते मार्गशीर्ष शुक्ल चंपाषाष्टी निमित्त घणसोली गावातील (कौल आळी) येथील भोपी कुलदैवत मंडळ व महिला मंडळाच्या वतीने चंपाषष्ठी उत्सवाचे खंडोबा मंदिरात आयोजन करण्यात आले होते.२ डिसेंबर पासून सुरुवात झाली. शनिवारी ७ डिसेंबर रोजी रात्री धार्मिक सोहळयाचा समारोप झाला.२ डिसेंबर पासून ते ७ डिसेंबर पर्यंत दररोज सायंकाळी ४ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत भजनांचे कार्यक्रम झाले. ९ ते ११ वाजेपर्यंत किर्तन झाले. सायंकाळी खंडोबाचे अध्याय वाचन करण्यात आले,दररोज आरती करण्यात आली.शुक्रवारी ६ डिसेंबर २०२४ रोजी खंडोबाचा जागरण



गोंधळ घालण्यात आला. जेजुरीचा राजा जागरण गोंधळ या पार्टीने सादर केले.

या सर्वांचे सहा दिवस भजन झाले. धरतीकला भजन मंडळ, कौलआळी, घनसोली, भारतीय सौहार्द भजन मंडळ घणसोली, श्री गावदेवी प्रासादिक भजन मंडळ घणसोली, श्रीराम स्मुर्ती महिला भजन मंडळ घणसोली, श्री सिद्धिविनायक भजन मंडळ घणसोली-तळवली, श्रीपती बाबा भजन मंडळ,डिकसालकर, कर्जत.

या सर्वांचे सहा दिवस कीर्तन झाले. ह.भ.प.निलेश महाराज शास्त्री, वाशीगांव, ह.भ.प. ज्ञानराज महाराज म्हात्रे, कोपरखैरणे, ह.भ.प.भास्कर महाराज म्हात्रे, वाशीगांव, ह.भ.प.संगीताताई काठोळे, वाडा, ह.भ.प. धनश्रीताई रानकर, घणसोली. ७ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १०:०० ते ५:०० वाजेपर्यंत होम हवन, श्री मार्तंड भैरव (खंडोबा) घटउत्स्थापना, तरी भंडारा व श्री सत्यनारायणाची महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी ७:३० वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच रात्री ९:०० ते ११:०० वाजेपर्यंत बायांची गाणी तुर्भेकर सांस्कृतिक कला मंडळ तुर्भे यांच्यातर्फे सादर करण्यात आले. अशा तऱ्हेने सहा दिवस चंपाषष्टी उत्सव मोठ्या उत्साहाने घणसोली गावात साजरा करण्यात आला. हा उत्सव पार पडण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष रामचंद्र पाटील, उपाध्यक्ष रेवनाथ भोपी, सचिव योगेश भोपी, सहसचिव रमेश पाटील, खजिनदार बळीराम पाटील, सहखजिनदार मोरेश्वर पाटील, सल्लगार विश्वनाथ पाटील,सदस्य सुरेश पाटील, शंकर पाटील, गिरीश भोपी यां सर्वांनी हा उत्सव व्यवस्थित रित्या पार पडण्यासाठी दिवस-रात्र मेहनत घेतली. या उत्सवाला यावर्षी २३ वर्षे पूर्ण झाली. आजही परंपरा, रुढी घणसोली ग्रामस्थांनी टिकून ठेवली आहे.

## शिक्षणाची कास धरून संघटित होणे ही काळाची गरज - सुभाष सवई

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.७, नांदेड :** मानव जीवनाच्या प्रगतीसाठी शिक्षण हे अत्यंत गरजेचे असून सर्वांनी शिक्षणाची कास धरून संघटित होणं ही काळाची गरज असून आज कालचे तरुण पिढी शिक्षणापासून दुरावत असून मुला मुलींनी शिक्षणाची कास धरून आपलं ध्येय पूर्ण करून समाजासाठी संघटित होणे ही काळाची गरज असल्याचे मत सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुभाष सवई यांनी उपसरपंच नगर स्वप्नजा गार्डन येथे आयोजित केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने मार्गदर्शन करताना केले. यावेळी व्यासपीठावर माजी शिक्षण संचालक नंदन नागरे सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक रामराव बुक्तरे, मुख्याध्यापक सुरेश पाटील, डी .एस. कांबळे, पत्रकार गंगाधर गच्चे, पोहेका. ज्ञानोबा टोम्पे, मु.अ. भीमराव कल्याणकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना सवई म्हणाले की, आजच्या युगामध्ये शिक्षणाचे अतिशय महत्त्व असून शिक्षणामुळे मानवाची प्रगती होते. त्यामुळे शिक्षण हे अत्यंत गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे शिक्षण हे वाघीणीचे दूध आहे ते प्रत्येकाने घेतलं पाहिजे व स्वतःचा कुटुंबाचा व समाजासाठी आपण आदर्श घेऊन जीवन घडवले पाहिजे. आजकाल ची तरुण-तरुणी शिक्षणापासून दुरावत असून त्यामुळे त्यांची अधोगतिकडे वाटचाल होत आहे. त्यांना जीवनाचा अर्थ कळत



नाही व त्यांची प्रगती होत नाही. त्यामुळे शिक्षणाची कास धरून संघटित होणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. डी एस कांबळे, श्रीनिवास फुलपगार, भीमराव कल्याणकर आदींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. सर्वप्रथम लक्ष्मण जाधवसह पत्नी तथागत भगवान गौतम बुद्ध व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर बौद्धाचार्य सुरेश लोकडे सर यांनी सर्वांना त्रिशरण पंचशील चे ग्रहण केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन से.नी. मुख्याध्यापक कुमारस्वामी माने यांनी केले.तर आभार पत्रकार गंगाधर गच्चे यांनी मानले. तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मिलिंद नागरे, देवानंद भगत, आनंद नरवाडे, प्रदीप भगत, मिलिंद वागरे, निर्मला नरवाडे, संभाजी बुक्तरे, लक्ष्मण कोकरे, गणेश सावंत, सुनीता गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

## ढोकेश्वर मंदिर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे; रस्त्याच्या कामाबाबत ग्रामस्थांमध्ये नाराजी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळीढोकेश्वर येथील नगर कल्याण राष्ट्रीय महामार्ग ते ढोकेश्वर मंदिर खामकर झाप वडगाव सावताळ पर्यंत रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे. आत्ताचं काही दिवसापूर्वी जवळ ८ कोटी रुपये खर्चून डांबरीकरण केले आहे. अद्याप अनेक ठिकाणी साइडपट्ट्या भरण्याचे काम बाकी आहे. रस्त्यावरील डांबर व खडी पूणपणे उखडले आहे. त्यामुळे या कामाची तपासणी व मोजमाप करावी. यामध्ये दोषी आढळणाऱ्या संबंधित ठेकेदार व त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा. अशी मागणी ग्रामस्थ व नागरिकांनी केली आहे.



टाकळी ढोकेश्वर येथे मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा २ अंतर्गत नगर कल्याण राष्ट्रीय महामार्ग ते ढोकेश्वर मंदिर खामकर झाप वडगाव सावताळ दरम्यानच्या रस्त्याला निधी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व माजी खा.डॉ.सुजय विखे पाटील यांनी ८.४५ कोटी रुपयांचा मंजूर केला. त्याचे भूमिपूजन तालुक्यातील महायुतीच्या नेत्यांनी केले होते. त्याचे काम एका चांगल्या ठेकेदाराच्या माध्यमातून होणे अपेक्षित असताना हे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देखरेखीखाली होत असल्यामुळे त्यांनी कशाही पद्धतीने केलेल्या कामाकडे दुर्लक्ष करून त्यांना पाठीशी घालण्याचे काम अधिकाऱ्यांकडून होत आहे. असा आरोप करण्यात आला आहे.

ढोकेश्वर वस्ती ते ढोकेश्वर मंदिरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण सुरू आहे. मात्र काम कोणताही नियमाला धरून करण्यात आले नसून हा रस्ता उखडल्याने या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. रस्ता बांधकामात वापरण्यात येणाऱ्या साहित्यावर सुद्धा प्रश्नचिन्ह निर्माण झाले. या रस्त्याच्या डांबरीकरणाची चौकशी करण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे. रस्त्याचे डांबरीकरणाचे काम फारच मंद गतीने सुरू आहे. रस्त्याचे कामे सुरू असताना काही ठिकाणी खड्डे पडले आहेत,खडी निघाली आहे. यामध्ये साइड पट्ट्या करण्यात आलेल्या नाहीत. १० फूट रुंदीचा रस्ता जेमतेम ८ ते साडेआठ फुटचा केला आहे. खडीचा वापर जेमतेमच करून माती मिश्रित मुरूमाचा वारेमाप वापर करण्यात आला आहे. यावर पाणी तर मारण्यात आलेच नाही. या कामाची असून चौकशी केल्याशिवाय बिले अदा करण्यात येवू नयेत. अशी मागणी शेतकरी व नागरिकांनी केली आहे. या भागात राहणारे लोक दररोज टाकळी ढोकेश्वर येथे जाण्यासाठी याच रस्त्याचा वापर करतात. त्यामुळे या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी. अशी मागणी वडगाव सावताळ, खामकर झाप ढोकी भागतील नागरिक करत आहेत.

# थोडक्यात

## मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे, पवार यांचा चालुक्य यांनी केला सत्कार

**अक्षराज : संगीता वनकळस**



**दि.०७, धाराशिव :** महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा भारतीय जनता पार्टीचे धाराशिव जिल्हाध्यक्ष संताजीराव चालुक्य पाटील यांनी सत्कार केला. तसेच पुढील राजकीय वाटचालीसाठी त्यांनी सदिच्छा दिल्या.

व्यापक लोकहितासाठी सदैव कृतिशील असणारे अष्टांगावधानी नेतृत्व म्हणजे ना.देवेंद्र फडणवीस. छत्रपती शिवरायांच्या अजिंक्य महाराष्ट्राने विकासाच्या राजकारणावर विश्वास ठेवत आपल्या अजोड नेतृत्वावर आज अधिकृतपणे शिक्कामोर्तब केले आहे. अगदी शेवटच्या माणसाच्या चेहर्यावरही आज मोठे समाधान झळकत असल्याची प्रतिक्रिया यावेळी धाराशिव जिल्हाध्यक्ष चालुक्य पाटील यांनी व्यक्त केली. या प्रसंगी तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील, राजेंद्र राऊत, भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, दत्ताभाऊ कुलकर्णी, सुनील चव्हाण, सतीश दंडनाईक व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## अस्थी अभिवादना करिता पानगावात उसळला भीमसागर
### डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जय घोषाने परिसर दुमदुमला

**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.०६, पानगाव (लातूर) :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबर रोजी पानगाव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी अभिवादनाला लाखो आंबेडकर अनुयायांनी मोठी गर्दी केली.'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो'च्या जयघोषाने पानगांव परिसर दुमदुमून गेला होता.

मुंबई, नागपूर वगळता मराठवाड्यात पानगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी आहेत. २ वर्षाच्या कालखंडानंतर यावर्षी अस्थी अभिवादनासाठी लाखो आंबेडकरी अनुयायांनी तोबा गर्दी केली होती. ०६ डिसेंबरच्या पहिल्या मिनिटाला अस्थी स्थळी भारतीय बौद्ध महासभा,समता सैनिक दलांच्या वतीने मानवंदना दिली. ट्रस्टच्या वतीने पुष्पचक्र अर्पण करून भदंत पय्यांनंद थेरो यांनी उपस्थितांना सामूहिक पंचशील त्रिशरण दिले.



महाराष्ट्रात मुंबई, नागपुर वगळता केवळ मराठवाड्यातील पानगांव ता.रेणापुर, जि.लातूर येथेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी आहेत. ज्यांना महापरिनिर्वाण दिनी मुंबईला जाणे शक्य झाले नाही. असे मराठवाड्या सह शेजारील कर्नाटक, तेलंगना, आंध्रप्रदेश राज्यातुन ही येथील अस्थीला अभिवादन करण्याकरिता लाखो अनुयायी येथे येतात. या निमिताने डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक पानगांव यांच्या वतीने सकाळी रेणापुरच्या तहसीलदार मंजुषा भगत यांच्या हस्ते पंचशील ध्वजवंदन करण्यात आले तर डॉ.आंबेडकर चौकातील ध्वजवंदन पानगांवच्या सरपंच मीनाताई मोटाडे यांनी केले.सकाळी साडेनऊ वाजता परळीकडून येणाऱ्या परळी -मिरज पॅसेंजर रेल्वेने आंबेडकर अनुयांयी हजारोच्या संख्येने स्टेशनवर उतरताना बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो च्या घोषना देत अस्थी अभिवादन करता येत होते. त्याचप्रमाणे,नांदेड-बेंगलोर एक्सप्रेस, पुर्णा-हैद्राबादतर दुपारी उदगीर, बीदर, कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेशाकडून येणाऱ्या रेल्वेमधुन आणि मोठ्या प्रमाणात मोटरसायकल, चारचाकी वाहतातुन आंबेडकरी आनुयायी पानगांवात दाखल होऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो असे, नारे देत अस्थी स्थळाकडे येत असल्याने आंबेडकरी जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. चौका-चौकांत अभिवादनाचे बॅनर, विविध पक्ष संघटनेचे मोफत अन्नदानाचे स्टॉल, पुस्तकासह आंबेडकरी साहित्य विक्रीच्या स्टॉल होते. तसेच विविध रक्तपेढीचे रक्त संकलन केंद्र, आरोग्य विभागाकडून जागो जागी भीम गीतांचे कार्यक्रम, पोलिस विभागाकडून पानगावच्या चहूबाजूच्या रस्त्यावर बॅरिकेड्स उभारण्यात आले होते. गावाच्या एक किलोमीटर लांबच वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था केल्याने आणि कमी प्रमाणात पार्किंग ते अभिवादन ठिकाणापर्यंत अनुयायीना पोहचण्या करिता त्रास होत होता. बरेच जण चालत येऊन आपल्या मुक्ती दात्याला अभिवादन करत होते. त्यामुळे पानगांवात आंबेडकरी अनुयायांच्या जणु महासागरच लोटल्याचे चित्र दिसून येत होते. यावेळी जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय, शासकीय, प्रशासकीयय मान्यवरांकडून अस्थिना अभिवादन करण्यात आले. आलेल्या लाखो आंबेडकरी अनुयांयीची कसली ही गैरसोय होणार नाही. याकरितापोलीस प्रशासन, समता सैनिक दल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक पानगांवचे भदंत पय्यांनंद थेरों, नामदेव आचार्य, विश्वनाथ आचार्य, क्षितीज रोडे,सुकेश भंडारे, सुभाष आचार्य, जे.सी.पानगांवकर, विष्णु आचार्य,गोरोबा आचार्य, नागनाथ चव्हाण, किशोर आचार्य, गौतम आचार्य, पंडीत आचार्य, रमेश तिगोटे, सत्यशिला आचार्य, तुकाराम कांबळे, शिवाजी आचार्य, रत्नराज आचार्य अदि विश्वस्त, शेकडो महिला पुरुष स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.

## धाराशिवमध्ये जनावरांच्या बेकायदेशीर वाहतुकीला पोलिसांचा चोप

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.०७, धाराशिव :** धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकाने दि.०५ डिसेंबर २०२४ रोजी रात्री ८ वाजता येडशी टोल नाक्यावर कारवाई करत जनावरांच्या बेकायदेशीर वाहतुकीला आळा घातला आहे. रामदास शिवाजी दराडे (वय ४०, रा.रामेश्वर, ता.भूम, जि.धाराशिव) या आरोपीला पिकअप वाहनातून (क्र. एमएच २५ एजे ३१४६) ३ जर्सी गाई आणि एक लहान कालवड असे ४ जनावरे कत्तलीसाठी घेऊन जाताना अटक करण्यात आली. आरोपीने जनावरांना वाहनात दाटीवाटीने बांधून निर्दयतेने वागल्याचे आढळून आले. जनावरांची किंमत ४८ हजार रुपये आणि पिकअप वाहनाची किंमत ४ लाख रुपये असा एकूण ४ लाख ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीविरुद्ध प्राण्यास कुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(ड) (ई), ए.एम.ए.पी.ॲक्ट कलम ५, ५ (अ), ५ (ब), ९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## ठेकेदाराला पाठीशी घालणार्या अभियंत्यास तात्काळ निलंबित करा
### मनसेचे विभागीय आयुक्तांना निवेदन

**अक्षराज : संगीता वनकळस**



**दि.०७, धाराशिव :** धाराशिव, पोहनेर, बेगडा, अपसिंगा, तुळजापूर जिल्हा मार्गाच्या रस्ता सुधारणा काम निकृष्ट, बोगस पद्धतीने करुन ठेकेदारास पाठीशी घालणारे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, उपअभियंता यांना निलंबित करुन त्यांच्या कालावधीत झालेल्या कामाची उच्चस्तरीय चौकशी करावी. अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे धाराशिव तालुकाध्यक्ष पाशाभाई शेख यांनी विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांना निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले की, धाराशिव - पोहनेर-बेगडा आपसिंगा-तुळजापूर रस्ता प्रजिमा - ३३ किमी ०/०० ते ७/०० मध्ये २ कोटी ३२ लाख रुपयांचे सुधारणा करण्याचे काम करण्यात आले. संबंधित ठेकेदाराने सदर रस्त्याचे काम पाहणारे (तत्कालीन) शाखा अभियंता, उपअभियंता, कार्यकारी अभियंता यांच्या संगणमताने सदर काम अत्यंत निकृष्ठ दर्जाचे केले. दरम्यानच्या काळात पूर्वी काम पाहणारे शाखा अभियंता यांची बदली झाली. त्यामुळे सदर रस्त्याचे मोजमाप, तपासणी करण्यासाठी कार्यकारी अभियंता यांच्या पत्रानुसार सहायक अभियंता के. एस. गायकवाड उपअभियंता मोरे यांच्यासोबत कामाची तपासण, मोजमाप करण्यासाठी गेले. रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने सदर काम कोणत्याच नियमाप्रमाणे मोजमाप प्रमाण नव्हते. यामुळे गायकवाड यांनी नियमानुसार पाहणी व मोजमाप करण्यास चालू गेले असता, संबंधित ठेकेदाराने त्यांना चव्हाण व मोरे यांच्यासमोरच अंगावर जाऊन शिवीगाळ, धक्काबुक्की, मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिली. हे सर्व घडत असताना दोन्ही वरिष्ठ अधिकारी फक्त पाहत होते. एवढे गंभीर प्रकरण घडूनही संबंधित ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न करणार्या अभियंता गायकवाड यांच्यावर दबाव टाकून त्यांना रोखण्यात आले. घडलेल्या प्रकरणी गायकवाड यांनी ०६ डिसेंबर रोजी उपअभियंता मोरे, कार्यकारी अभियंता चव्हाण यांना लेखी कळवूनही मोरे, चव्हाण यांनी कसलीही कार्यवाही केली नाही. तरी ठेकेदाराशी आर्थिक व्यवहार करुन आपल्याच एका अधिकार्याला मारहाण होऊन जीवे मारण्याची धमकी देणार्यास पाठीशी घालणारे व सदर रस्त्याचे निकृष्ठ व बोगस काम करुन घेणारे, उपअभियंता मोरे, कार्यकारी अभियंता चव्हाण यांना निलंबित करुन त्यांच्या कामाची उच्च स्तरीय चौकशी करुन गुन्हा दाखल करण्यात यावा अन्यथा याविरोधात आंदोलन करण्यात येईल, असेही शेख यांनी निवेदनात म्हटले आहे.

## मराठा सेवासंघ, संभाजी ब्रिगेडच्या वतीने नुतन आमदार पाटील यांचा सत्कार

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०७, पंढरपूर :** राज्यात लोकसभेची निवडणूक झाल्यानंतर विधानसभेची निवडणूक लागली होती. त्यामध्ये संभाजी ब्रिगेडने महाविकास आघाडीला पाठिंबा दिला होता. त्याच अनुषंगाने अपक्ष उमेदवार रणजितसिंह शिंदे व महाविकास आघाडीच्या वतीने शरद पवार गटाचे उमेदवार अभिजीत पाटील तर राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून मीनल साठे उभे होत्या. त्यामध्ये अभिजीत पाटील यांनी चांगल्या मताने विजय मिळवल्याने माढा तालुक्यातील मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेड यांच्यावतीने नुकताच सत्कार करण्यात आला.

या सत्कार समारंभाच्या वेळी संभाजी ब्रिगेडचे सचिन बापू जगताप म्हणाले की अभिजीत पाटील हे तळागाळातील कार्यकर्ते होते. त्यांनी संभाजी ब्रिगेड पासून कामाची सुरुवात केली होती. अनुभव असल्याने ते आज माढा तालुक्याचे आमदार झाले आहेत. म्हणून आज त्यांचा सत्कार मराठा सेवा संघ अन् संभाजी ब्रिगेड यांचे वतीने सत्कार करण्यात आला.



सत्कार समारंभाच्या वेळी तात्या पाटील जिल्हाध्यक्ष मराठा सेवा संघ, किरणराज घाडगे विभागीय अध्यक्ष, दिनेश जगदाळे रा.का.सदस्य, सचिन जगताप जिल्हाध्यक्ष संभाजी ब्रिगेड सोलापूर, किरण चव्हाण अध्यक्ष केळी उत्पादक संघ, संजयजी पाटील कृषी अधिकारी, बालाजी जगताप जि.उपाध्यक्ष, निलेश देशमुख तालुकाध्यक्ष मसेसं माढा, दिगंबर मिसाळ तालुकाध्यक्ष माळशिरस, अविनाश पाटील तालुकाध्यक्ष माढा, दत्तात्रय ताड तालुकाध्यक्ष पंढरपूर, बाळासाहेब बागल तालुकाध्यक्ष, स्वागत कदम शहराध्यक्ष पंढरपूर, प्रकाश गाजरे ता.उपाध्यक्ष पंढरपूर, शेखर आटकळे ता.उपाध्यक्ष, सतीश चांदगुडे ता.कार्याध्यक्ष, भारत माने, प्रशांत जगताप तालुकाध्यक्ष वाहतूक आ, अजय गायकवाड तालुकाध्यक्ष का.आघाडी, किरण जाधव ता.उपाध्यक्ष वि.आ, योगेश मुळे शहर उपाध्यक्ष टेंभुर्णी, उमेश जगताप युवा नेते सापटणे (टें), सागर गोडसे शाखाप्रमुख पिंपळनेर, महेश देशमुख, सागर पवार, नीळकंठ गरड युवा नेते उपळवटे, प्रविण आबा जगताप चेअरमन चंद्रभागा दुध संघ, सुनील ढवळे, प्रकाश नाना खुपसे सरपंच उपळवटे, गुणवंत वाघ युवा नेते आढेगाव, माऊली आटकळे युवा नेते शेगांव, पांडुरंग जगताप, बंडू आबा ढवळे, महादेव जगताप, बाळासाहेब भोसले शाखाप्रमुख कुर्डु, विजय आसबे शाखा उपाध्यक्ष, बंडू कुटे, स्वप्नील जगताप, महेश ब्रेदर संभाजी ब्रिगेड करकंब, प्रताप गवळी भाऊसाहेब, दत्तात्रय चव्हाण, सिध्देश्वर यादव संभाजी ब्रिगेड तावशी, गोरख ताड, ज्योतीराम बागवाले, दादासाहेब पवार साहेब, शिवाजीराव लोकरे सचिव मसेसं माढा, आर. डी.यादव भाऊसाहेब, शिवाजीराव लोकरे भाऊसाहेब आदी जण उपस्थित होते. संभाजी ब्रिगेडच्यावतीने सत्कार केल्याबद्दल त्यांचे आभार अभिजीत पाटील यांच्यावतीने नितीन सरडे यांनी मानले.

## महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०६, मिरा भाईंदर :** दिनांक ०६ डिसेंबर २०२४ रोजी दादर, चैत्यभूमी मुंबई येथे महामानव विश्वरत्न प.पू.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी गेले होते. लाखोंचा जनसागर चैत्यभूमी येथे लोटला होता. याप्रसंगी ओ.एन.जी.सी.एस.सी /एस.टी असोसिएशन तर्फे आरोग्य, डोळे तपासणी करून चष्मा वाटप शिबीर करण्यात आले. यावेळी विनोद गायकवाड, व्ही टी वानखेडे, अशोक कांबळे, सौमकुवर ह्यांची भेट घेतली. महाराष्ट्र राज्य नशाबंदी मंडळाच्या वर्षा विलास ताई व अमोल मडामे व अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे नंदकिशोर तालासिकर व विजय परब यांची उपस्थिती दिसून आली. तसेच प.पू.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

## बाबरी घटनेचा मुस्लिम बांधवांकडून निषेध

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.०७, धाराशिव :** ६ डिसेंबर १९९२ रोजी आयोध्या येथील बाबरी मस्जिद उद्धवस्त केल्याच्या घटनेचा तसेच उत्तर प्रदेश येथील संभल गावातील जामा मस्जिदचे सर्वेक्षण प्रकारानंतर झालेल्या गोळीबारात निष्पाप लोकांचा बळी गेल्याप्रकरणी निषेध करत अजमेर येथील सुफी संत ख्वाजा मोईनोद्दीन चिश्ती रहे. या दर्गाहच्या सर्वेक्षणाचा जाहीर निषेध धाराशिव येथील मुस्लिम बांधधंवानी केला आहे. याबाबत देशाच्या राष्ट्रपतींना निवेदन पाठविण्यात आले आहे. निवेदनात म्हटले की, आयोध्येतील जातीयवादी संघटना व पक्ष यांनी पुर्वनियोजीत कट करुन कारसेवकांच्या मदतीने बाबरी मस्जिद उध्वस्त करुन मस्जिद पाडली. त्यानंतर संपूर्ण देशात अराजकता माजून दंगली घडून हजारो लोकांचे बळी गेले, घरे उद्धवस्त झाली. या घटनेचा आम्ही तीव्र निषेध करीत आहोत. त्याकाळातील अराजकतेला जबाबदार असणार्या व्यक्ती व संघटना व त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर देशात विविध ठिकाणी गुन्हे दाखल असून अद्याप त्यांना कोणत्याही प्रकारे शिक्षा झाल्याचे ऐकिवात नाही. ही बाब अत्यंत निंदणीय व लाजिरवाणी असून या घटनेमुळे जगामध्ये देशाची प्रतिमा मलिन झाली आहे. तरी आपण सदरील घटनेच्या लोकांवर विविध ठिकाणी खटले चालवून त्यांना कठोरात कठोर शिक्षा द्यावी जेणेकरुन भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नये व ज्या लोकांचे प्राण गेले आहे. त्यांना न्याय मिळेल. निवेदनावर मसूद शेख, खलिफा कुरेशी, बिलाल तांबोळी, समीयोद्दीन मशायक, वाजीद पठाण, आयाज शेख, कादरखान पठाण, मैनुद्दिन पठाण, तौफिक पठाण, गयासोद्दीन शेख, अफरोज पीरजादे, इब्राहीम शेख, बाबा मुजावर, एजाज काझी, अन्वर शेख, मुदस्सीर काझी, आतिक शेख, असलम शेख, कलीम कुरेशी व इतर बांधवांची स्वाक्षरी आहे.